| MHRT100000282025 | <u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ०५/२०२५</u><br><u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u><br>(चंद्रकला पाडावे वि. यशवंत पाडावे व.७) |
|---|---|

श्रीमती चंद्रकला चंद्रकांत पाडावे
उ.व.सु. ६३ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. शेंबवणे, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी ४१६ ७०२. **----** अर्जदार

**-** विरुध्द **-**

१. यशवंत देऊ पाडावे **(**मयत**)**
वारस **-**
अ**)** मुलगी**-** श्रृती यशवंत पाडावे
व.व.सु. २७ वर्षे, धंदा - गृहिणी,
ब**)** मुलगी**-** काजल यशवंत पाडावे
व.व.सु.२४ वर्षे, धंदा - गृहिणी,

२. श्री**.** प्रभाकर देऊ पाडावे
उ.व.सु. ५८ वर्षे, व्यवसाय- शेती,
वरील सर्व रा.शेंबवणे, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी ४१६ ७०२.

३. शैला शांताराम लिगम
उ.व.सु.६४ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा.फुफेरे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

४. सुवर्णा पर्शुराम कुळये
उ.व.सु.६१ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. हसोळ तर्फे सौंदळ, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी.

५. श्री**.** अशोक पुनाजी पाडावे
उ.व.सु.५६ वर्षे, व्यवसाय- शेती,

६. रोहन चंद्रकांत पाडावे
उ.व.सु.३७ वर्षे, व्यवसाय- शेती व नोकरी,

७. श्री**.** योगेश चंद्रकांत पाडावे
उ.व.सु.३५ वर्षे, व्यवसाय- शेती व नोकरी,
वरील दोघे राहणार- शेंबवणे, **----** सामनेवाला**.**
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

०१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII ॲक्ट १८२७ चे कलम ७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे, अर्जदार व सामनेवाले क्र.१अ ते ७ यांचे मुळ पुरुष कै. बाळा राघा पाडावे हे फार पूर्वीच म्हणजे सन १९५६ मध्ये गाव मौजे शेंबवणे येथे मयत झाले असून त्यांचे पश्चात त्यांना देऊ व पुनाजी असे वारस मुलगे होते. त्यापैकी देऊ हे मोठे होते असल्याने त्यांचे नाव दावा मिळकतींना फेरफार नोंद क्र.५४ अन्वये दाखल झाले. मात्र पुनाजी यांचे नाव सदर दावा मिळकतींना काही अपरिहार्य कारणांस्तव दाखल होऊ शकलेले नाही. देऊ हे दि.०८/०१/२०२३ रोजी तर त्यांची पत्नी राधिका ही दि.२५/०७/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झालेली असून त्यांचे पश्चात त्यांना यशवंत, प्रभाकर हे मुलगे तर शैला व सुवर्णा अशा वारस मुली अ सून कै. देऊ यांचा फेरफार नोंद क्र.८२५ अन्वये वारसतपास होऊन त्यांचे पश्चात त्यांचे वारस म्हणजेच यशवंत व प्रभाकर हे वारस मुलगे तर शैला लिगम, सुवर्णा कुळये अशा वारस मुली असून त्यापैकी यशवंत हे दि.२९/०१/२०२३ रोजी नवी मुंबई तर त्यांची पत्नी योगिता मुंबई येथे मयत झाली असून त्यांचे पश्चात त्यांना श्रृती व काजल अशा वारस मुली आहेत. तसेच कै. बाळा राघा पाडावे याचा दुसरा मुलगा पुनाजी हे दि.०३/०३/१९९३ रोजी गाव मौजे शेंबवणे येथे मयत झाले असून तसे त्यांची पत्नी यशोदाबाई हया देखील दि.१३/०४/२००४ रोजी मौजे शेंबवणे येथे मयत झाल्या असून त्यांचे पश्चात चंद्रकांत व अशोक तोच सामनेवाला क्र.७ असे वारस मुलगे असून कै. चंद्रकांत यांचे पश्चात त्यांचे वारस म्हणजेच त्यांची पत्नी चंद्रकला तीच अर्जदार व तसेच रोहन तोच सामनेवाला क्र.५ व योगेश तोच सामनेवाला क्र.६ असे वारस मुलगे आहेत. वर नमुद केल्याप्रमाणे कै. बाळा राघा पाडावे यांचे पश्चात आता कै. यशवंत देऊ पाडावे यांचे नावे गाव मौजे शेंबवणे, ता. राजापूर, जि.रत्नागिरी येथे वडीलोपार्जित स्थावर मिळकती होत्या असून सोबत जोडलेल्या परिशिष्टात प्रस्तुत मिळकतींचे क्रमांक लिहिलेले आहेत. कै. देऊ बाळा पाडावे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचा मुलगा यशवंत देऊ पाडावे यांचे नाव सोबतच्या परिशिष्टामधील मिळकतींना ए.कु.प्र. म्हणून दाखल झाले. अर्जदार हया कायमस्वरुपी मुंबई येथे वास्तव्यास असल्याकारणाने

अर्जदार यांना त्यांचे व सामनेवाले क्र.५ ते ७ यांची नावे कै. पुनाजी बाळा पाडावे व त्यांची पत्नी कै. यशोदाबाई यांचे पश्चात वारस म्हणून सदर परिशिष्टातील दावा मिळकतींना दाखल करता येणे शक्य झालेले नव्हते. त्यामुळे अर्जदार यांना त्यांचे आजे सासरे कै. बाळा राघा पाडावे यांचे पश्चात प्रस्तुत मिळकतीकरीता सरकारी योजनांचा लाभ घेणेकामी प्रस्तुत मिळकतीला अर्जदार व सामनेवाले क्र.५ ते ७ यांची नावे महसूल दफ्तरी दाखल नसलेने अनेक अडचणी येत आहेत.

०३. अर्जदार यांचे पुढे कथन असे की, कै. पुनाजी बाळा पाडावे यांना त्यांचे मृत्यू पश्चात परि.क्र.३ मध्ये नमुद प्रमाणे वारस असून त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे जवळचे वारस म्हणून त्यांचे पश्चात अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ यांना स्वत:ला वारसा हक्क आहे. अर्जदार यांना कै. बाळा राघा पाडावे यांचे पश्चात प्रस्तुत दावा मिळकतींना वारस दाखला मिळणेबाबत बॉम्बे रेग्युलेशन VIII ॲक्ट १८२७ चे कलम ७ अन्वये कोणतीही हरकत अथवा अडचण येत नाही. तसेच इतर कोणत्याही कायद्यान्वये वारस दाखला देणेस हरकत नाही. तरी सोबत दर्शविलेल्या परिशिष्टामधील जमिन मिळकतीला अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे एकमेव वारस असलेबाबतची स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस अर्जदार तयार आहे. सदर अर्जास कारण हे कै. पुनाजी बाळा पाडावे हे मयत झालेमुळे त्यांचे पश्चात अर्जदार व सामनेवाले क्र.५ ते ७ हे प्रस्तुत दावा मिळकतीना वारस म्हणून दाखल होणेकरीता अलीकडेच म्हणजेच दि.२०/१२/२०२४ रोजी संबंधित तलाठी गाव मौजे पांगरे यांचेशी संपर्क साधून मागणी केली असता त्यांनी अर्जदार यांना ''तुमचे नाव दावा मिळकतींना नोंदलेले नसल्यामुळे तुम्हाला सरकारी योजनांचा लाभ घेता येणार नाही'' असे सांगून ''तुम्ही कै. पुनाजी बाळा पाडावे यांचे वारस असलेबाबत न्यायालयाकडून दाखला घेऊन त्यानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य होईल'', असे सांगितल्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज कै. पुनाजी बाळा पाडावे यांचे अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे वारस असलेबाबत वारस दाखला मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला क्र.१अ ते ४ यांची पूर्णपणे संमत्ती आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत वंशावळीचे परिशिष्ट अ जोडलेले दिसून येते. अर्जदार

यांनी याकामी अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे कै. पुनाजी बाळा पाडावे हयांचे वारस असलेबाबत वारस दाखला देणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जाचे कामी सामनेवाला क्र.१अ ते ७ यांनी हजर होवून निशाणी क्र.१२ येथे त्यांचे कबुली म्हणणे दाखल करुन अर्जदार यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.१अ ते ७ यांना मान्य व कबुल असल्याचे व अर्ज मंजूर करण्यात यावा असे म्हटलेले आहे.

०५. अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार तसेच सामनेवालांतर्फे विधीज्ञ श्री. पी. एम. हर्डीकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | होकारार्थी. |
| २ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत -**

०६. अर्जदारांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे याकामी दाखल केलेली आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | गाव मौजे शेंबवणे येथील गाव नमुना ८अ. | नि.क्र.१६ |
| ०२ | गाव मौजे शेंबवणे येथील फेरफार क्र.५४. | नि.क्र.१७ |
| ०३ | गाव मौजे शेंबवणे येथील फेरफार क्र.८२५ | नि.क्र.१८ |
| ०४ | गुप ग्रामपंचायत पांगरे बुद्रुक शेंबवणे येथील दि.३१/१२/२०२४ रोजीचा वारस दाखला. | नि.क्र.१९ |
| ०५ | पोलीस पाटील शेंबवणे यांजकडील दि.३१/१२/२०२४ रोजीचा वारस दाखला. | नि.क्र.२० |

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०६ | कै. चंद्रकांत पुनाजी पाडावे यांचा दि.२२/१०/२०२५ रोजीचा मृत्यूदाखला. | नि.क्र.२१ |
| ०७ | कै. पुनाजी बाळाजी पाडावे यांचा दि.०३/०३/१९९३ रोजीचा मृत्यूदाखला. | नि.क्र.२२ |
| ०८ | कै. यशोदाबाई पुनाजी पाडावे यांचा दि.१३/०४/२००४ रोजीचा मृत्यूदाखला. | नि.क्र.२३ |
| ०९ | कै. राधिका देऊ पाडावे यांचा दि.२५/०७/२०२१ रोजीचा मृत्यूदाखला. | नि.क्र.२४ |
| १० | कै. यशवंत देऊ पाडावे यांचा दि.२९/०१/२०२३ रोजीचा मृत्यूदाखला. | नि.क्र.२५ |
| ११ | कै. योगिता यशवंत पाडावे यांचा दि.०२/११/२०१४ रोजीचा मृत्यूदाखल्याची छायांकित प्रत. | नि.क्र.५/११ |

०७. अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दि.०५/०५/२०२५ रोजी दैनिक 'सागर' रत्नागिरी आवृत्ती मधील जाहिर नोटीस **(**नि.क्र.२६**)** काढण्यात आली. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, राजापूर न्यायालयाचे नोटीस बोर्डवर, ग्रामपंचायत कार्यालय शेंबवणे व तलाठी सजा शेंबवणे यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिरनामाचा दाखला **(**नि.क्र.९**)** याकामी दाखल आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही.

०८. अर्जदार श्रीमती चंद्रकला चंद्रकांत पाडावे यांनी याकामी स्वत:चे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र **(**नि.क्र.१३**)** दाखल केलेले आहे. सरतपासणीचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार व सामनेवाले क्र.५ ते ७ हे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे हिंदु वारसा कायदा १९५६ च्या तरतुदीप्रमाणे वारस ठरतात. अशाप्रकारे अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्रमांक २ बाबत -

०९. मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविलेला आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.५ ते ७ हे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार श्रीमती चंद्रकला चंद्रकांत पाडावे आणि सामनेवाला क्र.५ श्री. अशोक पुनाजी पाडावे, सामनेवाला क्र.६ रोहन चंद्रकांत पाडावे व सामनेवाला क्र.७ योगेश चंद्रकांत पाडावे हे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship certificate) त्यांना त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदार यांनी सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे मयत पुनाजी बाळा पाडावे यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषीत.)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.03.31 16:34:05 +0530

दिनांक - २७/०३/२०२६

(एस. एस. हाके)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, राजापूर.

## CERTIFICATE

"Judgment/Order in :- Civ. M. A. No.05/2025

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

Name of Stenographer:- M. N. Patil.

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 27-03-2026

Order signed by P.O. on :- 30-03-2026

Order Digitally signed by P.O. on :- 30-03-2026

Order uploaded on :- 31-03-2026